**जोशूचे विश्व**

जोशूला मित्र खूप आणि खूपच !

जोशू त्यांच्या घरी जायचा,
जेवायचा, राहायचा
ते त्याच्या घरी यायचे,
जेवायचे, राहायचे
जोशूला हे सारे आवडायचे!

जोशू थोडा मोठा झाला !

तेव्हा अभ्यास वाढला
मित्र घरी येईनात,
बोलवेनात त्यांचे घरचे त्यांना,
सारखे अभ्यासाला बसवत
जोशूचे मन अभ्यासात नसायचे !

शाळेत आता प्रकल्प सुरू झाले!
मित्रांसमवेत हिंडायचे
माहिती मिळवून निबंध लिहायचे
चित्रे काढायची, वस्तू करायच्या
गडबड, धावपळ,
मज्जाच मज्जा
जोशू आता अभ्यासू झाला!